
Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार




वर्ष ५७ वे, अंक ८वा, मुंबई । ऑक्टोबर २०२४
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 57, Issue : 8, Mumbai I October 2024
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50




## मराठी भाषेला अभिजात दर्जा




देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

**समाचार**

वर्ष ५७वे, अंक ८वा,
ऑक्टोबर २०२४
(फक्त सभासदांसाठी)



**श्री. महेंद्र गंधे**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**श्री. मिलिंद सरदेशमुख**
कार्यवाह

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९

अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही



दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in




देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था, सोलापूर आयोजित निबंध स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ



बडोदा दे ऋ ब्रा. संस्थेचे श्री प्रताप रांजणगावकर यांचा गौरव



प्राध्यापिका श्रीमती शुभदा कुलकर्णी दे ऋ ब्रा शिक्षणोत्तेजक संस्था,सोलापूर संस्थेस देणगी देताना


अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ
आयोजित
संगीतमित्र प्रस्तुत
''दिपावली स्नेहमिलन''
आणि
''संगीतमय कार्यक्रम''
डॉ. राहुल जोशी
गायक
धनश्री देशपांडे
गायिका
निवेदिका :- धनश्री दामले
वादक कलाकार :- ओंकार देवस्कर, पंकज धोपावकर, संदिप कुलकर्णी
किरण गायकवाड, मयुरेश शेर्लेकर.
स्थळ :- लक्ष्मीनारायणबाग ,बाळ गोविंददास मार्ग,
माहीम मुंबई-400016
तरिख:-27 ऑक्टोबर 2024
वेळ :- सायंकाळी 5.30 वाजता.

# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

२०२४-२०२७ मध्यवर्ती मंडळाच्या त्रैवार्षिक निवडणुकीसाठी अनामत रक्कम भरलेल्या खालील सदस्यांनी मध्यवर्ती मंडळास भरलेली अनामत रक्कम देणगी म्हणून दिली आहे.

| नाव | रक्कम |
|---|---|
| श्री. विलास जोशी | रु. १५००/- |
| श्री. महेंद्र गंधे | रु. १५००/- |
| श्री. प्रभाकर कुलकर्णी | रु. १५००/- |
| श्री. विनोद मांडके | रु. १५००/- |
| श्री. मिलिदं सरदेशमुख | रु. १५००/- |
| सौ. रोहिणी तडवळकर | रु. १५००/- |
| श्री. गणेश वढवेकर | रु. १५००/- |
| डॉ. हरी महाशब्दे | रु. १५००/- |
| श्री. रामचंद्र दिगवडेकर | रु. १५००/- |
| श्री. सुनिल पारखी | रु. १५००/- |
| श्री. विजय चाव्हरे | रु. १५००/- |
| श्री. विनोद देशमुख | रु. १५००/- |
| श्री. जगन्नाथ जोशी | रु. १५००/- |
| श्री. मधुकर कुलकर्णी | रु. १५००/- |
| नितीन शहापूरकर | रु. १५००/- |
| श्री. अनिल पानसे | रु. १५००/- |
| श्री. अनिकेत अटेकर | रु. १५००/- |
| श्री. मंदार तगारे | रु. १५००/- |
| श्री. रमेश पाटील | रु. १५००/- |
| सौ. केतकी कुलकर्णी | रु. १५००/- |
| श्री. जयंत देशपांडे | रु. १५००/- |
| श्री. आश्विन उपाध्ये | रु. १५००/- |
| श्री. गिरिश कुलकर्णी | रु. १५००/- |
| सौ. मिनल गंधे | रु. १५००/- |

# संपादकीय

नमस्कार मंडळी,

गेल्याच महिन्यात आपण गोपाळकृष्णाचा जन्मोत्सव आणि दही काल्याचा उत्सव साजरा केला. हा महाराष्ट्रातला एक पारंपारिक, अति उत्साही आणि ऊर्जा भरलेला उत्सव असतो. दहीहंडी मध्ये थर लावण्याची स्पर्धा विविध कलापथकांमध्ये असते. आठ- नऊ थरांपर्यंत आपण ऐकलेले असेल, बघितलेले असेल. या प्रकारामध्ये एक थोडी विनोदी, पण मार्मिक अशी टिप्पणी एके ठिकाणी वाचण्यात आली. ती अशी-वर्षातून एकच दिवस असा असतो की जेव्हा मराठी माणूस मराठी माणसाला वर जायला मदत करतो. हे आपण प्रयत्नपूर्वक खोटे ठरवायचे आहे.

गंमतीचा भाग किंवा टीकेचा भाग सोडून देऊया आणि या सगळ्या उत्सवाकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून बघूया. प्रत्येक थरातला सभासद असा विचार करत असतो आणि तशी कृती पण करतो. संघ वृत्तीचे आणि परस्पर सहकार्याचे यापेक्षा दुसरे समर्पक असे उदाहरण देता येत नाही. आजच्या घडीला सुद्धा आपल्या सगळ्या सभासदांनी, प्रत्येक भारतीय नागरिकाने एकजूट दाखवणे, तसे कसोशीने प्रयत्न करणे आणि एकत्र राहणे अतिशय महत्त्वाचे आहे. परस्परातील विरोध, परस्परांतील भांडणे विसरून आपण सगळ्यांनी एकत्र राहायला पाहिजे एकजूट दाखवायला पाहिजे. कठीण अशा प्रस्तुत काळातील ती एक आवश्यक अशी गरज आहे. आपली एकजूट होऊ नये आणि समाज विभाजित राहावा, यासाठी काही लोक विषेशतः राजकीय नेते मंडळी, मुद्दाम प्रयत्नशील असतात त्या सगळ्यांना आपण खोटे पाडले पाहिजे. अहंकार बाजूला ठेवा. चला तर सगळे आपण त्या दिशेने प्रयत्नास लागू या. बटेंगे तो कटेंगे अशी पण एक टिप्पणी वाचनात आली. महत्वपूर्ण, विचार आणि आचार करण्या जोगी वाटली. सगळ्या टिप्पणीवर समर्पक विचार करून आचरण करणे अत्यंत गरजेचे आहे. एकजूट अतिशय महत्वाची आणि अत्यावश्यक आहे. प्रयत्नास लागू या आजपासूनच. उद्या पण नको उशीर झालेला असेल.

मंडळी, त्यानंतर बहुतेकांचे घरी गणपती बाप्पाची प्राणप्रतिष्ठा पूर्वक स्थापना झाली आणि दुसरे, पाचवे, सातवे आणि अनंत चतुर्दशीला आम्ही साश्रु नयनांनी बापाला निरोप दिला. उत्साहाचे-जल्लोशाचे वातावरण घरा घरात होते. एकंदर या उत्सवामध्ये सर्व प्रकारचे प्रदूषण टाळण्याचे आवाहन सर्व थरातून करण्यात आलेले होते. त्याचे निश्चित पालन करणे प्रत्येकाचे कर्तव्य ठरते. पूजेसाठी फुले पत्री सुद्धा खूप जास्त प्रमाणात घेऊ नये. पर्यावरणाचे भान राखले जाईल असे प्रयत्न करावे. पुढील वर्षासाठी गणपतीची मूर्ती ही शाडूचीच घ्यावी. प्रत्येक सभासदांनी शाडूच्या मूर्तीचा आग्रह धरावा. मूर्ती चीनी बनावटीची नसावी. पूजा विधीत सुद्धा मृतिका मूर्तीचा उल्लेख आहे, प्लास्टरचा नाही. प्लास्टरची मूर्ती ही बरेच महिने जशीच्या तशी तलावाच्या-समुद्राच्या तळाशी राहते. तिचे विघटन लवकर होत नाही. तेवढ्यासाठी मूर्ती शाडूचीच असावी आणि जमल्यास घरातच बादलीत तिचे विसर्जन करावे आणि ती माती कुंडीत टाकावी किंवा मूर्तिकाराला परत करावी. मखराचे साहित्य पर्यावरणपूरक असावे. सणाचे पावित्र्य काटेकोर पाळले जावे.

आता घराघरात घटस्थापना होउन माता भगवतीचे नियमित पूजन होत असेल. घागरी फुंकणे आणि गरबा नृत्य वगैरेची रेलचेल असेल. साडेतीन मुहूर्तापैकी एक मुहूर्त विजयादशमीचा याच महिन्यात आहे. तेव्हा बरीच खोळंबलेली कामे, आवश्यक कामे या दिवशी सुरुवात करायला हरकत नाही. तुम्ही सर्वांनी कोजागिरीचा सुद्धा आनंद लुटावा. आणि दिवाळीच्या तयारीस लागावे.

सुष्टांचे संरक्षण व्हावे, दृष्टांचा नाश व्हावा. जगात शांती नांदावी. युद्धे थांबावीत. अशी त्या भगवती मातेजवळ प्रार्थना.

# नुपेक्षी कदा राम दासाभिमानी (भाग ५)

**स.भ. मोहनबुवा रामदासी (मो. : ९१४६८५५६९१)**

अहल्या शिळा राघवे मुक्त केली । पदी लागतां दिव्य होऊनी गेली।
जया वर्णिता सिणली वेदवाणी। नुपेक्षी कदा राम दासाभिमानी।

अहिल्या मुक्तीची कथा रामायणातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायक कथा आहे. अहिल्या, महर्षी गौतमांची पत्नी, शापामुळे शिळेत रूपांतरित झाल्या होत्या. इंद्राच्या कपटामुळे महर्षी गौतमांनी अहिल्येला शाप दिला की ती शिळेच्या रूपात राहील आणि त्यातून केवळ श्रीरामच तिला मुक्त करू शकतील. ह्या कथेच्या माध्यमातून भगवान राम आपल्या भक्तांचे कसे उद्धार करतात, हे स्पष्ट होते.

अहिल्या अत्यंत तेजस्वी आणि पवित्र होती, परंतु कपटाने तिला शाप मिळाला आणि ती वर्षानुवर्षे शिळेच्या रूपात एकाकी पडून राहिली. परंतु तिच्या मनात भगवंताविषयी निष्ठा आणि शुद्ध भक्ती होती. हेच कारण होते की ती तिच्या उद्धाराची प्रतीक्षा करू शकली. रामायणानुसार, प्रभू श्रीराम वनवासात असताना गौतम ऋषींच्या आश्रमात आले, आणि त्यांच्या चरणस्पर्शाने अहिल्या मुक्त झाली. रामाचे आगमन म्हणजेच देवाच्या कृपेचे आगमन होते, ज्यामुळे अहिल्या तिच्या पापातून मुक्त झाली आणि तिला पुन्हा तिचे पूर्ववत तेज प्राप्त झाले. शिळा होणं आणि त्यातून मुक्तता होणं हे प्रतिक रुपाने आपण पाहिले पाहिजे. शब्दशः अर्थ न घेता भावार्थ आपण पाहिला पाहिजे. एखाद्या व्यक्तीस बंधन येणं, कुणीही त्याच्याशी संवाद न साधनं, काहीही न करता एकाच जागी असणं हे म्हणजेच शिळा होणं असाही होतो.

प्रभु श्रीराम आपल्या भक्तांना त्यांच्या पापांतून मुक्त करण्यासाठी नेहमीच तत्पर असतात. अहिल्येच्या कथेने हेच दर्शवले आहे की, जेव्हा एखादा भक्त निस्वार्थपणे भगवंताची भक्ती करतो आणि आपल्या चुका प्रांजळपणे मान्य करतो, तेंव्हा त्यांचा उद्धार निश्चितच होतो. भगवान आपल्या भक्तांची सदैव रक्षा करतात, त्यांना कष्टातून आणि अडचणींतून सोडवतात. अहिल्या जरी शापित होती, तरी तिने आपला विश्वास कायम ठेवला आणि प्रभू रामांनी तिची भक्ती ओळखून तिचा उद्धार केला.

श्रीराम सर्व भक्तांना समदृष्टीने पाहतात आणि त्यांच्या भक्तांच्या जीवनातील अडचणी दूर करतात. अहिल्या मुक्तीची कथा हे अधोरेखित करते की भगवंताच्या कृपेने कोणतेही संकट किंवा शाप दूर होऊ शकते. त्यांच्या चरणस्पर्शाने शिळेचे रूप असलेली अहिल्या पुन्हा एकदा जीवनात परतली, हे दाखवते की भगवान राम आपल्या भक्तांच्या उद्धारासाठी स्वतःहून आणि केंव्हाही येऊ शकतात, फक्त आपली भक्ती तशी हवी आणि आपल्याला तसा विश्वास पाहिजे. ही कथा आपल्या जीवनात सद्गुणांची प्रतिष्ठापना करते आणि श्रीरामांवरील भक्ती व श्रद्धा कशी असावी, हे शिकवते. तसेच श्रीराम आपल्या भक्तांची उपेक्षा कधीही करत नाहीत उलट ते आपल्या भक्तांचा अभिमान बाळगतात.

**सर्व सभासद, हितचिंतक, देणगीदार यांना**
**दसरा, दीपावलीच्या**
**हार्दिक शुभेच्छा!**

# सहज सोपे संस्कृत

**सौ. वृषाली मधुसूदन भिडे** (मो. : ९८२११२५७८७७)

**सुरससुबोधा विश्वमनोज्ञा ललिता हृद्या रमणीया**
**अमृतवाणी संस्कृतभाषा नैव क्लिष्टा न च कठिना।।**

वरील सुभाषितावरुनच संस्कृतभाषेच्या सोपेपणाची यथार्थ कल्पना येते. अगदी संस्कृतभाषेचे ज्ञान नसलेल्या माणसालाही त्या सुभाषिताचा अर्थ सहजपणे लक्षात येईल. अतिशय रसाळ, समजण्यास सोपी, मनःस्पर्शी, जणू अमृताचाच शिडकावा करणारी ही संस्कृतभाषा अगदी मोजक्या शब्दात व्यापक अर्थ मार्मिकपणे मांडणारी एकमेव भाषा. ‘सुरभारती’, ‘गीर्वाणवाणी’, ‘देववाणी’ अशा अभिधानांनी प्रचलित अशी ही संस्कृतभाषा बालपणापासूनच सर्वांच्या परिचयाची आहे. ‘श्रीरामरक्षा’, ‘गणपत्यथर्वशीर्षम्’ ह्या स्तोत्रांची घरोघरी पारायणे होतात. ही सर्वभाषांची जननी आहे. ह्या भाषेच्या अभ्यासाने शब्दोच्चार स्पष्ट होतात, पाठांतराची सवय लागते. या भाषेतील विसर्गाच्या यथोचित उच्चाराने प्राणायामाचा लाभ प्राप्त होतो. ऱ्हस्व, दीर्घ उच्चारणामुळे शब्दाच्या अर्थातील फरक आपल्याला हीचा भाषा शिकविते. इतर भाषांमधील व्याकरणात एक व अनेक अशी दोनच वचने असतात. पण संस्कृतभाषेतील व्याकरणात असलेले ‘द्विवचन’ ही ह्या भाषेने वाचकांना दिलेली देणगीच आहे.

प्राचीन काळापासूनच संस्कृतभाषा व्यावहारिक भाषेच्या रुपाने प्रचलित होती. रामायण महाभारताच्या काळातही ही लोकभाषा म्हणूनही रुढ होती. भारतीय शास्त्रांची तत्वे बारकाईने जाणून घेण्यासाठी संस्कृत


JV MARKETING & INVESTMENTS
Premium Residential & Corporate Real Estate Advisor

Sales And Marketing Of New Projects
Pre-leased Commercial & Retail Options
Business & Home Loan Assistance

Rahul V. Deshpande
MBA - Marketing
+91 98330 25031
jvmarketinginvestments@gmail.com

Samarth Raghukul, Gokhale Road South, Dadar West, Mumbai - 400 028
MahaRERA ID - A51900028785 @jvmarketing18 jvmarketing18

**For enquiries and bookings in new projects across Mumbai, Thane and Navi Mumbai, kindly contact Rahul V. Deshpande - 98330 25031**

वाङ्गमय अत्यंत उपयुक्त आहे. शब्दवैभवाने व विचारवैभवाने नटलेली ही भाषा जगप्रसिध्द आहे. सत्ययुग, त्रेतायुग व द्वापारयुग या तील युगांमध्ये संस्कृत हीच विश्वाची भाषा होती त्यामुळे तिला 'विश्ववाणी' सुध्दा म्हणतात. अपौरुषेय म्हटले जाणारे वेद फक्त याच भाषेत आहेत. संस्कृतभाषते प्रादेशिक उच्चार नावाचा प्रकार नाही. ही भाषा तिच्या व्याकरणाचे नियम, समास, संधी यानुसारच लिहावी लागते. तिच्यातील प्राचीन ज्ञानभांडारही मूळ स्वरुपात जसेच्या तसे उपलब्ध आहे. संस्कृत व्याक्यातील शब्दांचा क्रम कसाही ठेवला तरी अर्थ बदलत नाही. याचे सोपे उदाहरण म्हणजे 'रामः आम्रं खादति' हे वाक्य 'आम्रं खादति रामः', 'खादति रामः आम्रम्' या क्रमाने लिहीले तरी त्याचे भाषांतर 'राम आंबा खातो' असेच होते. इतकी सुलभता दुसऱ्या कोणत्याही भाषते नाही. म्हणूनच ह्या भाषेचा आवाका, तिच्यातील माधुर्य समजण्यासाठी शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांमध्ये ह्या भाषेची गोडी निर्माण केली पाहीजे. संभाषणात, लेखनात, पाठांतरात ह्या भाषेतील सोप्या शब्दांचा प्रयोग केला पाहीजे. 'व्हॉट इज युवर नेम' पेक्षा 'तव नामधेयं किम्' विचारण्याची सवय लावली पाहीजे. मुंबई शहरात विविध भाषिक लोक एकत्र रहातात. आपलाच शेजारी गुर्जरभाषिक किंवा दाक्षिणात्यही असू शकतो. त्यांचे व्यवहारातील शब्द रोज ऐकूनच आपल्याला त्या भाषेची ओळख होते. तसेच आपल्या घरापासून 'वंदे मातरम्', 'देवाय नमः', 'शुभस्य शीघ्रम' या व अशा प्रकारच्या सूक्ती ऐकवण्याचा सराव करावा. म्हणजे आपोआपच ह्या देववाणीचा प्रसार होईल. इतकेच नाही तर वाढदिवसाला हॅपी बर्थ डे ऐवजी जीवेत शरदः शतम् म्हणून शुभेच्छा द्या. कानाला किती गोड वाटेल! दूरध्वनीवरील किंवा भ्रमणध्वनिवरील संभाषण हॅलो ऐवजी हरि ओम् ने सुरु केले तर! अशी सुरुवात प्रत्येकाने स्वतःपासून केली पाहीजे. कारण यः क्रियावान् सः पण्डितः या न्यायाने जो प्रत्यक्ष कृती करतो तोच विद्वान. म्हणजेच सर्वांकडूनच संस्कृतभाषेचा प्रसार करण्याची कृती घडली पाहीजे. चन्दामामा, सम्भाषण-सन्देशः यासारखी मासिके भेटवस्तू म्हणून परस्परांना दिली पाहिजेत. संगणक, दूरदर्शनसारखे दृक्-श्राव्य सशक्त माध्यम आकाशवाणी याद्वारे सर्वांनीच संस्कृत भाषेतून कार्यक्रम केले व ऐकले पाहीजेत. ग्रंथालय, प्रदर्शने अशा ठिकाणी जुने संस्कृत साहित्य उपलब्ध करून भाषांतरासहीत या पुस्तकांकडे जनसामान्यांना आकर्षित केले पाहीजे. संस्कृतसप्ताह संस्कृतदिन तसेच संस्कृतसम्मेलन आयोजित करून ही सरळ सोपी सुबोध देववाणी आपण सर्वांनी रुढ केली पाहीजे. विद्यालये तसेच महाविद्यालयांच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या वेळी संस्कृत-मराठी तसेच संस्कृत-आङ्ग्ल शब्दकोशांचे वाटप सर्व विद्यार्थ्यांना केले पाहीजे.

संस्कृतभाषा सर्वश्रेष्ठ भाषासम्राज्ञी होऊन राहिली आहे. हा भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा आहे. प्रत्येक माणसात चैतन्य निर्माण करणारी अशी ही महत्त्वाची ज्ञानवाहिनीच आहे. जगातील कोणत्याही भाषेच्या अंगावर न आढळणारा एक अलंकार संस्कृतभाषा अंगा-खांद्यावर मिरवीत असते. हा अलंकार म्हणजे सुभाषित. ह्या भाषेत शेकडो विषयांवर हजारो सुभाषिते आहेत. दोन-चार ओळीत खूप मोठा आशय, सुविचार, तत्व, तत्वज्ञान, त्रिकालाबाधित सत्य सांगणारा हा साहित्य प्रकार जगातील कोणत्याही वाङ्मयात आढळत नाही. पाठांतर करायला सोप्या असलेल्या या सुभाषितांमुळे व्यक्तीची विद्वत्ता व लेखन यांना वेगळीच उंची प्राप्त होते. संस्कृतला सहस्त्रावधी वर्षांची परंपरा आहे. ती परिपूर्ण भाषा आहे. माणसाच्या व्यक्तीमत्त्वाच्या सर्वांगीण विकासाला उपयुक्त अशी ही भाषा आहे. अनेक जड व क्लिष्ट विषय वाचून निरुत्साही झालेल्या मनाला संस्कृत श्लोक नवसंजीवनीच देतात. मनाची एकाग्रता वाढते. जगातील सर्व विषयांचे ज्ञान संस्कृतभाषेच्या आदिग्रंथातच आहे. वेद, उपनिषदे, स्तोत्रे, आयुर्वेद, ज्योतिष, योग इत्यादी विषयांवर संस्कृत भाषेत परिपूर्ण माहिती आहे. म्हणून कला, वाणिज्य, व विज्ञान शाखेसाठी स्वतंत्र रुपाने ह्या भाषेच्या अभ्यासाचे आयोजन केले पाहिजे. जसे वाणिज्यशाखेतील विद्यार्थ्यांना हजारो वर्षांपूर्वी लिहिलेल्या कौटिलीय अर्थशास्त्राचा परिचय

करून दिला तर दे स्तिमित होतील व तत्कालीन पण आजही उपयुक्त असणाऱ्या तत्वांचे आचरण करतील. विज्ञानशाखेतील विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात आयुर्वेद, शल्यतन्त्र, सुश्रुत संहिता, अष्टाङ्गहृदय या चरक–सुश्रुत–वाग्भट या बृहतत्रयींनी लिहीलेल्या ग्रंथांचा समावेश करावा त्यामुळे विविध रोग व त्यावरील उपचारांचे यथायोग्य मार्गदर्शन मिळेल. कलाशाखेत तर कविकुलगुरु कालिदास, भास भर्तृहरी यासारख्या विद्वानांचे अजरामर साहित्य ठेवल्यास सर्व युवा पिढी नक्कीच सुसंस्कृत होईल. संस्कृत विषय शिकविणाऱ्या शिक्षकाची जबाबदारी फार मोठी आहे. त्याने संस्कृतचे संस्कृतत्व जपले पाहिजे. संस्कृतत्व म्हणजे पाणिनीय व्याकरणाचे नियमबंधन. माझ्या संभाषणात, लेखनात, शिकविण्यात पाणिनीय नियमांनुसार उच्चारणशुध्दता असावी यासाठी त्याने जागरुक असले पाहीजे. विद्यार्थ्यांसाठी छोट्या वाक्यरचना असलेले स्वाध्याय तयार केले पाहिजेत. पाश्चिमात्यांच्या प्रभावामुळे भारतीय भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी होत आहे. त्यासाठी संस्कृतभाषेची गोडी वाढविणे व समाजातही लोकांना समजतील असे भाषापाठ, व्याकरणपाठ, काव्यपाठ, शास्त्रपाठ तयार केले पाहिजेत. दर रविवारी संस्कृत–संभाषण वर्ग आयोजित करून ह्या देववाणीचा प्रसार घरोघरी केला पाहिजे.

संस्कृतभाषेच्या अभ्यासाने इतर सर्व भाषांचा अभ्यास करणे सोपे होते. मराठी किंवा इंग्रजी भाषेच्या निबंधात 'वसुधैव कुटुम्बकम्', 'भूषणैः किं प्रयोजनम्', 'वृक्षाः सत्पुरुषा इव' अशी संस्कृतवचने घालून तो निबंध अलंकारिक करता येतो. या भाषेचा संक्षिप्तपणा हा अनमोल अलंकार असल्याने ही भाषा संगणकाच्या शिक्षणासाठी उपयुक्त आहे हेही आता सिध्द झाले आहे. तेव्हा प्रत्येकाने संस्कृत भाषा शिकण्याचा संकल्प करूया व आत्मोन्नति साधून भावी युवा पिढी सुसंस्कृत करण्याचा निश्चय करूया. ह्या भाषेचा वारसा आपल्याला लाभला आहे हे आपले परमभाग्यच. म्हणून पिढ्यानुपिढ्या चालत आलेला वारसा आपण अधिक समृध्द करूया व या देववाणीच्या प्रचारासाठी आजन्म प्रयत्न करूया कारण ह्या संस्कृतभाषेचे अमरत्व एकाच समर्पक सुभाषितात केले आहे.

**तावदेषा देवभाषा देवी स्थास्यति भूतले**
**यावच्च वंशोऽस्त्यार्याणां तावदेषा ध्रुवंध्रुवा।।**

# संलग्न संस्था वृत्त

मुंबई : आनंदाची बातमी म्हणजे महाराष्ट्र शासनातर्फे ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात आले आहे. ब्राह्मण समाजातर्फे वारंवार मागणी करण्यात आल्याने महाराष्ट्र शासनाने परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापनेचा शासन निर्णय नुकताच निर्गमित केला आहे. ब्राह्मण समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील सुशिक्षित बेरोजगार तरुणा करीता शेतीपूरक व्यवसाय, विपणन, प्रक्रिया उद्योग, पुरवठा व साठवणूक याचबरोबर लघुउद्योग, वाहतूक व अन्य व्यवसाय उद्योग उपलब्ध करून देणे किंवा त्यास अर्थ सहाय्य करून स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करणे तसेच आर्थिक स्तर उंचावण्यासाठी ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात येत असल्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

त्याचप्रमाणे अनेक योजना ज्या सद्यस्थितीमध्ये अमृत या स्वायत्त संस्थेमार्फत राबवल्या जातात उदाहरणार्थ स्पर्धा परीक्षांसाठी प्रोत्साहनपर अर्थसहाय्य, शैक्षणिक अर्थसहाय्य, रोजगारक्षम कौशल्य विकास, औद्योगिक व उन्नत कौशल्य विकास, आर्थिक विकास यांचा लाभ सदर महामंडळाच्या स्थापनेनंतरही ब्राह्मण समाजातील

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील युवक, युवती व इतर उमेदवारांना अमृत या संस्थेच्या विविध योजना/उपक्रम/कार्यक्रम यांचा लाभ नेहमीप्रमाणेच घेता येणार आह. ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात आल्याबद्दल अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष श्री महेंद्र गंधे आणि कार्याध्यक्ष श्री प्रभाकर कुलकर्णी यांनी महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री एकनाथरावजी शिंदे आणि मा. उपमुख्यमंत्री श्री देवेद्र फडणवीस आणि शासनाचे आभार मानले. उपक्रमाद्वारे राबविण्यात येणाऱ्या योजनाच्या यशस्वीतेसाठी शासनाने राज्यस्तरीय, देशस्तरीय ब्राह्मण संस्थाचे सहकार्य घ्यावे अशी अपेक्षा अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे कार्यवाह मिलिंद सरदेशमुख यांनी व्यक्त केली..

**वडोदरा** : अभिनंदन : सतत ५० वर्षे गरबा खेळण्याचा विक्रम – वडोदरा गुजरात येथे नवरात्रोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. गुजरातची ओळख असलेल्या गरब्याने तमाम भारतीय तसेच परदेशी लोकांना भुरळ घातली आहे. बी एस एन एल चे निवृत्त सहाय्यक श्री प्रताप रांजणगावकर हे आपल्या पन्नास वर्षापासून नियमितपणे गरबा खेळण्यासाठी नवरात्रीला येत असतात. सुरुवातीला चोखंडी आता ओएनजीसी मध्ये स्ट्रीट गरबा,कल्याण बाग, युनायटेड वे, आर्कि सारख्या मोठ्या गरबा मैदानात नियमितपणे गरबा खेळतात. श्री रांजणगावकर यांना दरवर्षी पुरस्कार मिळतो. बेस्ट कॉस्च्युम, सारखे अनेक बक्षिसे त्यांनी जिंकली आहेत. दरवर्षी खेळण्याच्या शैलीत वैविध्य आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. कपड्यांमध्ये देखील वेगवेगळे रंग आणि डिझाईन देखील आणलेले आहेत . त्यांच्या यशात सुविध्य पत्नी सौ मंगलाताई यांचा मोठा वाटा आहे. कुटुंबातील प्रत्येक जण कलाकार आहेत. पत्नी रांगोळी कलाकार आहे, आणि मुलगा आशिष यानाही गरब्यात पुरस्कार मिळाले आहेत. लिमका बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद होण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. श्री प्रताप रांजणगावकर यांना खूप खूप शुभेच्छा.

**कल्याण** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कल्याण संस्थेच्या माध्यमातून रविवार, दि. ०२ ऑक्टोबर २०२४, सर्वपित्री अमावास्या, या दिवशी सभासदांच्या / हितचिंतकांच्या सांस्कृतिक विधी सोयीसाठी सामुहिक महालय ही संकल्पना काही कार्यकारणी सदस्यांनी कार्यकारणी पुढं मांडली.

त्यासाठी सभागृह मांडणी, गुरुजी, इतर यांची मोजक्या भासदांसाठी नांव नोंदणी केली.वरील विधी सकाळी १०.०० ते ०२.०० यावेळेत संपन्न झाले. या कार्यक्रमाचे पौराहित्य संस्था सदस्य व कल्याणचे श्री. केतन खरे गुरुजी यांनी आपल्या चार सहाय्यक गुरुजींच्या अधिपत्या खाली केले, यात सर्व उपस्थितांनी योग्य मांडणी व विधी यथोचित झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

यानंतरची भोजन व प्रसाद व्यवस्था श्रीमती पाटील यांनी खूप छान सांभाळली.या कार्यक्रमाच्या उत्तम व्यवस्थेसाठी जयंत देशमुख, रमेश पालकर, विजय चाव्हरे, यांनी मेहनत घेतली त्यांना काळकर व योगेश पाटे व इतर कार्यकारणी सदस्यांनी सहकार्य केले. अशी सामुहिक महालय ही संकल्पना दरवर्षी संस्थेनं आयोजित करावी असं सर्व सदस्यांनी सुचवले.

* दहावी माध्यमिक शालांत परिक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांना अभ्यास कसा करावा या विषयावर एकदिवसीय मार्गदर्शन शिबिर दि ४ ऑक्टोबर रोजी व पाचवी ते सातवीच्या गरजु विद्यार्थ्यांना गणवेश वाटप दि २३,२४, २८सप्टेंबर रोजी करण्यात आले.

दरवर्षी प्रमाणे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कल्याण व कल्याण जनता सहकारी बँक संचालक समाजसेवा पुरस्कार निधी न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने कल्याण मधील खालील चार शाळांतील विद्यार्थ्यांना परिक्षेसाठी अभ्यास कसा करावा या विषयावर कल्याणातील प्रतिथयश जेष्ठ व श्रेष्ठ तज्ञ शिक्षक श्रीमान देवेंद्र ताम्हणे सर यांचे मार्गदर्शन केले. सारंगधराचे शशांक विद्यालय, शिशु विकास माध्यमिक विद्यालय, छत्रपती शिक्षण मंडळाचे अभिनव विद्या मंदिर, पारनाका, बापगांव जवळील छत्रपती शिक्षण मंडळ या संस्थांचे पदाधिकारी

व मान्यवर उपस्थित होते. त्याच वेळी अभिनव विद्या मंदिर शाळेतील पाचवी ते सातवी वर्गातील गरजु काही विद्यार्थ्यांना शालेय गणवेश वाटप कल्याण जनता सहकारी बँक माजी संचालक प्राध्यापक वसंतराव काणे, विद्यमान संचालक/कार्यवाह संचालक समाजसेवा पुरस्कार निधी न्यास, श्रीमान पद्मनाभ जोशी, देऋब्रा संघ कल्याण अध्यक्ष श्रीमान सुरेश कुळकर्णी, शैक्षणिक मार्गदर्शन शिबिर प्रमुख प्रशिक्षक श्रीमान देवेंद्र ताम्हणे व इतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, शाळेतील शिक्षक वर्ग व विद्यार्थी वर्ग उपस्थित होता.

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कल्याण व कल्याण जनता सहकारी बँक संचालक समाजसेवा पुरस्कार निधी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित. शालांत परीक्षेस बसवलेल्या विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा हा शैक्षणिक उपक्रम म्हणजे सामाजिक पालकत्वाचे उत्तम उदाहरण आहे. गेल्या दोन-तीन वर्षातील या उपक्रमामुळे या सर्व शाळांतील दहावीच्या शालांत परिक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांना खुप फायदा झाला, ही सर्व विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापकांची प्रतिक्रिया आहे.

**बेळगांव :** श्री रमेश रामराव पाटील अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे नवनिर्वाचित कार्यकारी सदस्य यांचा अभिनंदनीय उपक्रम बेळगांव येथे संपन्न.

अनोखा विक्रम आपल्या गावाकडच्या वडिलोपार्जित शेतीत जिथे वर्षाला ८० ते १०० इंच पाऊस पडतो तिथे या वर्षी त्यांनी ९००० निलगिरीची झाडे लावली आहेत. मागच्यावर्षी पण त्यांनी ७००० झाडे लावलेली होती. त्यांच्या या फॅमिलीच्या १७.५ एकरच्या फार्म मध्ये जवळपास २०००० निलगिरीची झाडे आतापर्यंत त्यांनी लावलेली आहेत. त्या व्यतिरिक्त काजू, आंबा व सागाची पण वृक्ष आधी पासून लावलेली आहेत. झाडे लावण्यासाठी योजना, इच्छाशक्ति, भरपूर श्रम आणि गावकऱ्यांची मदत लागते हे त्यांनी साध्य केलेले आहे त्याबद्दल त्यांच्या या उपक्रमा बद्दल धन्यवाद आणि शुभेच्छा.




*Protect Capital & Create Wealth.....*

**JAYANT DESHMUKH**

B.COM. CAIIB DBM

**Insurance & Investment Consultant**

LIC (MDRT 2020) Mediclaim, Health Insurance & Mutual Fund

M. : 9930445721 / 9702837022

Email : deshijayant5@gmail.com

Off. : 106, Shrivatsam, First Avenue Business Park, Durgadi Chowk, Kalyan West - 421201
Resi. : Shree Ram Tower, Near Jain Society, Kalyan (West) 421301

LIC

STAR Health Insurance

- Joint Treasurer - Deshastha Rugvedi Brahman Sangha, Kalyan
- Manager - Laxmi Narayan Vadhu-Var Suchak Kendra, Kalyan
- Member - Brahman Business Network Group, Kalyan
- Past Manager, State Bank of India
- Director - MPFC Udyog Nidhi Ltd., Kalyan
- Trustee, Balaji Mandir Trust, Kalyan
- General Secretary, Karnataka Sangha, Kalyan
- Past Vice President, Andhra Association, Kalyan
- Prudent Partner - Mutual Fund Distributor / Company Deposit / Insurance

Get Insured... & Be Secured....

**नाशिक** : नाशिकचे अजिंक्य मुकुंद कुलकर्णी देशातील ३५ वर्षापेक्षा कमी वयाच्या उद्योजकांच्या यादीत ४७ व्या स्थानी. हुरून इंडियाने प्रथमच ३५ वर्षाखालील भारतीय उद्योजकांवर केंद्रित यादी जारी केली. यात ३५ आणि यापेक्षा कमी वयाच्या दीडशे उद्योजकांचा समावेश असून त्यांच्या व्यवसायाचे किमान मूल्यांकन पाच कोटी डॉलर (४१५ कोटी रुपये) आहे. आणि ते भविष्यातील मोठे उद्योजक असतील. संपत्तीच्या बाबतीत श्री अजय मुकुंदराव कुलकर्णी कोट्यावधी संपत्तीचे मालक आहेत असे मत हुरून ने व्यक्त केले आह. या यादीत महाराष्ट्राचे एकूण ३३ उद्योजक त्यात पुण्याचे पाच व नाशिकचे श्री अजिंक्य कुलकर्णी यांचा समावेश आहे.

नाशिक देशस्थ ऋग्वेदी संस्थेचे अध्यक्ष आणि अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक यांचे ते चिरंजीव असून वित्तीय सेवा क्षेत्रात काम करणाऱ्या विंट वेल्थचे सह संस्थापक आहेत. विन्ट वेल्थ या पोर्टलद्वारे गुंतवणुकीचा सुरक्षित पर्याय उपलब्ध करून दिला आहे. श्री अजिंक्य मुकुंद कुलकर्णी यांचे अभिनंदन व भावी वाटचालीस शुभेच्छा.

**सोलापूर** : दि. २१ सप्टेंबर रोजी सोलापूर येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था युवक शाखेच्या वतीने आयोजित निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण पार पडले. श्री सरस्वती विद्या मंदिर येथील इयत्ता दहावीच्या विध्यार्थ्यांसाठी गणेशोत्सवानिमित्त नव्या शतकातील भारत या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली होती. स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी उस्फुर्त सहभाग नोंदवला होता.सदर स्पर्धेसाठी परिक्षक म्हणून क्षितिजा गाताडे यांचे सहकार्य लाभले. उद्योजक दत्ता आण्णा सुरवसे यांच्यातर्फे यशस्वी विध्यार्थ्यांना आणि प्रमुख पाहुणे यांना भेटवस्तू देण्यात आली. पारितोषिक प्राप्त विध्यार्थ्यांना रोख रक्कम, प्रमाणपत्र आणि भेटवस्तू देण्यात आली तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले. या कार्यक्रमासाठी सरस्वती मंदिर शाळेच्या सचिवा प्रीती चिलजवार या प्रमुख पाहुणे आणि डॉ. श्रीकांत येळेगावकर अध्यक्ष म्हणून लाभले.

दे. ऋ. ब्रा. संस्थेचे युवक अध्यक्ष सुशांत कुलकर्णी यांना सर्व उपस्थितांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. रवींद्र नाशिककर आणि हेमा चिंचोळकर तसेच प्रशालेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी रवींद्र नाशिककर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे युवक अध्यक्ष सुशांत कुलकर्णी यांनी केले आणि सरस्वती शाळेच्या मुख्याध्यापिका नीता येरमाळकर यांनी आभार मानले.

## मराठी भाषेला अभिजात दर्जा

मराठी भाषा प्रेमींनो,

गेली अनेक वर्षापासून प्रलंबित असलेली मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याची मागणी अनपेक्षित पणे पुर्ण झाली. अनपेक्षित या अर्थाने की केंद्र सरकार असा सुखद धक्का देईल अशी कोणालाही कल्पना नव्हती. गेली अनेक वर्षापासून या आघाडीवर राज्य सरकार, साहित्य महामंडळे व इतर मराठी प्रेमी संस्था व साहित्यिक आपापल्या परिने प्रयत्न करत होते.त्यामुळे मराठी भाषेने अभिजातटप्पा गाठल्याबद्दल सर्व संबंधितांचे मन:पुर्वक अभिनंदन व आभार. सर्व पक्षीय अभिनिवेश बाजूला सारून हे यश निर्भेळपणे साजरे केले पाहिजे.

३ ऑक्टोबर २०२४ रोजी, भारत सरकारने मराठी, पाली, प्राकृत, आसामी आणि बंगाली या पाच नवीन अभिजात भाषांना मान्यता दिली. या निर्णयामुळे भारतातील एकूण मान्यताप्राप्त अभिजात भाषांची संख्या अकरा झाली, ज्यात तमिळ, संस्कृत, तेलगू, कन्नड, मल्याळम आणि ओडिया यांचा समावेश आहे.

मराठी पुस्तके आपापल्या क्षमते प्रमाणे खरेदी करा, वाचा व लेखकांना प्रोत्साहन द्या– वाढदिवस, लग्न समारंभ, निवृत्ती समारंभ, पदोन्नती अशा प्रसंगात पुस्तके भेट द्या व वाचन वृद्धीस चालना द्या.

## नम्र आवाहन

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचा ८७ वा वर्धापन दिन सोमवार दि १४ ऑक्टोबर २०२४ रोजी संस्थेच्या लक्ष्मीनारायण सभागृहात साजरा करण्याचे ठरविण्यात आले आहे. त्यानिमित्त श्रीसत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले असून सर्व सभासदांनी तीर्थ प्रसादाचा लाभ घ्यावा ही विनंती तसेच दि. २७ ऑक्टोबर २०२४ रोजी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याही कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

## वधू पाहिजे

* **अमोल किशोर कावळे** (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख : ०१/०८/१९९२, जन्म वेळ : ०५.३० सकाळ, जन्म ठिकाण : कर्जत (रायगड), उंची : ५.८, रक्तगट : ओ (+), गोत्र : भारव्दाज, रास : सिंह, नक्षत्र : पुर्वा फालगुनी, चरण : प्रथम, नाडी : मध्य, गण : मनुय, शिक्षण : एम.कॉम, नोकरी/ व्यवसाय : , वार्षिक उत्पन्न : ७.५० लाख, अपेक्षा : अनुरूप, कुठले ही स्थळ चालेल, संपर्क क्र : ९०२९६६६११०.

* **अनिकेत श्रीकांत जोशी** (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख : २६.०८.१९९२, जन्म वेळ : २.०६, जन्म ठिकाण : ठाणे, उंची : ५.४, गोत्र : अत्री, रास : कर्क, नक्षत्र : पूय, चरण : २, नाडी : मध्य, गण : देव, शिक्षण : बी ई आय टी, नोकरी/ व्यवसाय : सर्विस प्रायव्हेट कॉ. , वार्षिक उत्पन्न : १३,४५लाख, अपेक्षा : अनुरूप, नोकरी करणारी किंवा करण्याची तयारी, संपर्क क्र : ९९३०९२५४५७/ ९७६९६३५४५७

* **विपुल विलास कुलकर्णी** (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख : ०९/०९/१९९२, जन्म वेळ : १.१५ दुपारी, जन्म ठिकाण : धुळे, उंची : ६.१, गोत्र : कौशिक, रास : मकर, नक्षत्र : श्रवण, चरण : ४, नाडी : अंत्य, रक्तगट : ए (+), गण : देवगण शिक्षण : बीई/एमइ मर्कॅनिकल, नोकरी/ व्यवसाय : प्रोफेसर इन इंजिनियरींग कॉलेज, वार्षिक उत्पन्न : ४.२० लाख, अपेक्षा : पदवीधर,अनुरूप, शाकाहारी , संपर्क क्र : ९७६८१२८२९९/ ९८९०१०३२९३

* **आनंद दत्तात्रय गोखले** (कोकणस्थ), जन्म तारीख : १७/०९/१९९२, जन्म वेळ : ११.०५ रात्री, जन्म ठिकाण : कल्याण, उंची : ५.४, गोत्र :काश्यप, रास : ऋषभ, नक्षत्र : कृतिका , चरण : ३, नाडी : अंत्य, रक्तगट : ओ (+), गण : राक्षसगण, शिक्षण : बीई– केमिकल, पी. जी. डीप्लोमा इन सिम्युलेशन, नोकरी/ व्यवसाय : खाजगी, वार्षिक उत्पन्न : २१ लाख, अपेक्षा : पदवीधर ,समंजस मनमिळावू नोकरी/ व्यवसाय करणरी, अनुरूप कुठलीही पोटशाखा चालेल एकत्र कुटूंब पद्धतीत राहण्याची तयारी, संपर्क क्र : ९८१९६४५४२६/ ९८६७०७०४०३

* **जयेश दत्तात्रय दशपुत्रे** (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख : २६.१२.१९९२, जन्म वेळ : ५.३० सकाळी, जन्म ठिकाण : अलिबाग, उंची : ५.८, रक्तगट : ओ (+), गोत्र : गौतम, रास : मकर, नक्षत्र : उत्तरादृाढा, चरण : ३, नाडी : आद्य, गण : मनुय, शिक्षण : उच्च माध्यमिक ाालांत परीक्षा उत्तीर्ण, नोकरी/ व्यवसाय

: खाजगी कंपनी , वार्षिक उत्पन्न : २.४ लाख, अपेक्षा : अनुरूप,मन मिळावू , संपर्क क्र : ९८३३५९२५३३/ ९०२२४१२०३३ ,

**※ प्रितेश विवेक हिंगणे** (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख : १४.०१.१९९३, जन्म वेळ : ९.५० रात्री, जन्म ठिकाण : कल्याण, उंची : ५.५, रक्तगट : ए (+), गोत्र : अत्री, रास : कन्या, नक्षत्र : चित्रा, चरण : १, नाडी : मध्य, गण : राक्षस, शिक्षण : बी.एम.एम ॲडव्हर्टायजिंग, डिप्लोमा इन फोटोग्राफी, नोकरी/ व्यवसाय : स्वत:चा फोटोग्राफी व्यवसाय , वार्षिक उत्पन्न : ४.२० लाख, अपेक्षा : पदवीधर, स्वतंत्र व्यवसाय करणारी, समजुतदार, संपर्क क्रं : ९८१९४५२८३५/९९२०७७०३३७ ,

**※ क्षितीज सारंग जोशी**, जन्म तारीख : ०३.०२.१९९३, जन्म वेळ : ५.३२ सायंकाळी, जन्म ठिकाण : अकोला, उंची : ५.११, रक्तगट : बी (+), गोत्र : शांडील्य, रास : मिथुन, नक्षत्र : मृग, चरण : , नाडी : मध्य, गण : , शिक्षण : बी.ए.सी इन होटलमॅनेजमेंट नोकरी/ व्यवसाय : खाजगी, वार्षिक उत्पन्न : ६ लाख, अपेक्षा : पदवीधर, नोकरी करणारी, संपर्क क्र : ९८३३०७३८४८ / ९९३०६६८००३

**※ चिन्मय शिरीश देशपांडे** (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख : ०९.०२.१९९३, जन्म वेळ : १.७ दुपारी, जन्म ठिकाण : भोर (पुणे), उंची : ५.८, रक्तगट : बी (+), गोत्र : वशिष्ट, रास : सिंह, नक्षत्र : उत्तरा भाद्रपदा, चरण : १, नाडी : आदय, गण : मनूय, शिक्षण : बी कॉमप्यूटर , नोकरी/ व्यवसाय : टी.सी. एस मुंबई, वार्षिक उत्पन्न : २१ लाख, अपेक्षा : मन मिळावू, शाकाहारी,, संपर्क क्र : ९८६९०६६६६८ / ९७५७२८४४५४

**※ अजिंक्य निशीकांत जालनेकर** (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख : ०३.०४.१९९३, जन्म वेळ : ०७.३० सकाळ, जन्म ठिकाण : बुलढाणा, उंची : ५.३, गोत्र : कात्सायन, रास: कर्क, नक्षत्र : अश्लेषा, चरण : ४, नाडी : अंत्य, गण : राक्षस, शिक्षण : बी.ए. डिप्लोमा इन कॉमप्युटर हार्डवेअर अँड नेटवर्कींग, नोकरी/ व्यवसाय : खाजगी कंपनी पुणे, वार्षिक उत्पन्न : ४.५ लाख, अपेक्षा : अनुरूप, संपर्क क्रं : ९८६९९५५०११/ ९५०३५५०५२३

**※ अमेय संतोष गंधे** (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख : २५.११.१९९५, जन्म वेळ : ००.३६ रात्री, जन्म ठिकाण : विलेपार्ले (मुंबई), उंची : ५.८, रक्तगट : ओ (+), गोत्र : भारव्दाज, रास : धनु, नक्षत्र : मूळ, चरण : ३, नाडी : आद्य, गण : राक्षस, शिक्षण : बीकॉम (इनवेस्टमेंट बँन्कीगं), जापनीज् भाषा कोर्स, नोकरी/ व्यवसाय : मुंबईत बहुराष्ट्रीय इनव्हेस्टमेंट बँकमध्ये फायनान्शियल असोसिएट, वार्षिक उत्पन्न : ५.५४ लाख , अपेक्षा : अनुरूप पदवीधर, कायम नोकरी सुस्वभावी मन मिळावू, संपर्क क्रं : ९९६९७४१४२५ / ९९६७२१५५५८

## वर पाहिजे

**※ कु. स्नेहा राजेंद्र भावे**, कल्याण (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख : ०२.११.१९९१, जन्म वेळ : १२.५४ दुपारी, उंची : ५.३, रक्तगट : ओ(+), गोत्र : भार्गव, रास: सिंह, नक्षत्र : पूर्वा फाल्गुनी, चरण :बाळव, नाडी : मध्य, गण : मनुय, शिक्षण : एम.ए.इतिहास, नोकरी/ व्यवसाय : कोचिंग क्लासेसमध्ये परिक्षा सुपरव्हायझरचे काम करते , वार्षिक उत्पन्न : तासावर मिळतात, अपेक्षा :निर्व्यसनी आणि मनमिळावू, संपर्क क्र : ९८६९५८८५७१/ ९७६९६९९२२१ ,

* **कु. वैदेही रविशंकर,** जन्म तारीख : २४.०२.१९९४, जन्म वेळ : ८.१५ सकाळ, जन्म ठिकाण : कल्याण, उंची : ५. ४ १/२, रक्तगट : ओ (+), गोत्र : विश्वामित्र, रासः कर्क, नक्षत्र : पुय, चरण : ४, नाडी : मध्य, गण : देवगण, शिक्षण : बीई. सिव्हिील, एम ए. सायकॉलॉजी, नोकरी/ व्यवसाय : आर्य गुरूकुल मध्ये कौन्सिलर , वार्षिक उत्पन्न : २,४०,०००, अपेक्षा : ब्राण उंच (५.८ चे वर), वयातील अंतर ३ र्वोपेक्षा जास्त नको, उच्च शिक्षित चांगले घराणे, पत्रिका जुळायला हवी. संपर्क क्र : ८०९७८८३८४० / ९८२०७०९४७०

* **कु. शिवानी नितीन गरूड** (देशस्थ ऋग्वेदी ब्राण) , जन्म तारीख : ०२.०३.१९९५, जन्म वेळ : ११.०० सकाळ, जन्म ठिकाण : मुंबई, उंची : ५.२, रक्तगट : ओ( –), गोत्र : वार्धव्य, रासः कुंभ, नक्षत्र : पूर्वा भाद्रपदा, चरण : २, नाडी : आद्य, गण : मनुयगण, शिक्षण : एम.एसी.सी केमिस्ट्री नोकरी/ व्यवसाय : प्राईव्हेट कंपनीत, वार्षिक उत्पन्न : ९.५ लाख, संपर्क क्र : ९७६८४४९३६४ / ९८२१४३९५६७

* **कु. गौरी किशोर जोशी** (देशस्थ यजुर्वेदी) , जन्म तारीख : ०३.०१२.२०००, जन्म वेळ : १.५८ रात्री, जन्म ठिकाण : भुसावळ (जळगाव), उंची : ५.६, रक्तगट : ओ (–), गोत्र : सांकृत्य, रासः कुंभ, नक्षत्र :धनिठा, चरण : ३, नाडी : मध्य, गण : राक्षसगण, शिक्षण : एम कॉम , नोकरी/ व्यवसाय :नोकरी, वार्षिक उत्पन्न : ३.५ लाख, संपर्क क्र : ९९३०४४५७२१ / ९८६७२५४४३४ / ९९६७४४०२०८, अपेक्षा : सुशिक्षित, सुस्थितील शुध्द शाकाहारी, ठाणे, मुंबई, नवी मुंबई मधील असावे, गौरवर्णीय, वयात २/३ वर्षाचे अंतर असावे.

* **कु. प्राची रामचंद्र खरे** (कोकणस्थ), जन्म तारीख : १७.०५.१९८९, जन्म वेळ : ५.०६, जन्म ठिकाण : कल्याण, उंची : ५.१, रक्तगट : ओ (+), गोत्र : कौशिक, रासः कन्या, नक्षत्र : हस्त, चरण : ४, नाडी : आद्य, गण : देवगण, शिक्षण : उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, नोकरी/ व्यवसाय : नाही, वार्षिक उत्पन्न :नाही, अपेक्षा : वयातील अंतर ३ वर्ष, निर्व्यसनी , मन मिळावू, समकक्ष , मासिक उत्पन्न २० हजार पेक्षा जास्त असावे, मानसिक व्यंग – सौम्य (ओ सी डी) स्वच्छते विषयी आहे. उपचार चालू आहे. संपर्क क्र : ९९६९०१८९९३

* **सायली अनिल कुलकर्णी** देशस्थ यजुर्वेदी, जन्म तारीख : ०१.०१.१९९०, जन्म वेळ : १ दुपारी, जन्म ठिकाण : डोंबिवली, उंची : ५.३, रक्तगट : ए (+) , गोत्र : ाांडील्य, रास : कुंभ, नक्षत्र : ाततारका, चरण : १, नाडी : आद्य, गण : राक्षस, शिक्षण : बी. एम. एस, नोकरी/ व्यवसाय : डोबिंवली, वार्षिक उत्पन्न : ३ लाख, अपेक्षा : किमान पदवीधर, वार्षिक उत्पन्न ४ लाखावर , सुस्वभावी समजुतदार, संपर्क क्रं :९८६९४८७८२२/ ८४२५८१४००७

* **राधिका अनिल देशपांडे** (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख : १३.०४.१९९२, जन्म वेळ : ६.१५ संध्याकाळी, जन्म ठिकाण : बेळगाव, उंची : ५.३, रक्तगट : ओ (–), गोत्र : काश्यप, रास : सिंह, नक्षत्र :मघा, चरण : ४, नाडी : अंत्य, गण : राक्षस, शिक्षण : सी ए, नोकरी/ व्यवसाय : प्रायव्हेट कंपनी, वार्षिक उत्पन्न : ३३ लाख, अपेक्षा : अनुरूप, आज्ञाधारी, समजुतदार, संपर्क क्र :८६६९५३४०५२/८१०८४४००१२

* **रोहीणी शेखर संत** (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख : २२.११.१९९२, जन्म वेळ : १.२१ , जन्म ठिकाण : डोबिंवली, उंची : ५.४, गोत्र : मुद्गल, रास : तुला, नक्षत्र : स्वाती, चरण : २, नाडी : अंत्य, गण : देवगण, शिक्षण :बॅचलर ऑफ फाइन आर्टस इन मेटल वर्क, पी.जी इन कॉम्पेरीटीव्ह मायथॉलॉजी, अपेक्षा : मनमिळावू, कुटंबवत्सल, सामाजिक बांधिलकी, कला साहित्य संगीत, अध्यात्म याची आवड जपणारा, संपर्क क्र : ९३२२४१४५४०

✻ **रूचा अनिल कूलकर्णी** (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख : ०६.०१.१९९४, जन्म वेळ : ५.३० पहाटे, जन्म ठिकाण :पुणे, उंची : ५.३, रक्तगट : ए (+) , गोत्र :भारद्वाज, रास : तुला, नक्षत्र : चित्रा, चरण : ४, नाडी : मध्य, गण : राक्षस, शिक्षण : कॉप्युटर इंजिनीयर , नोकरी/ व्यवसाय : नोकरी (सातारा), वार्षिक उत्पन्न : १ लाख, अपेक्षा : इंजिनीयर ,स्वत:चे घर असाव देशस्थ ऋग्वेदी प्राधान्य इतर ाखा चालतील, शाकाहारी, संपर्क क्र : ९८२३६३८९६२/ ८३५६८१९३७५

**(टीप : स्थळांची माहिती पडताळून घेण्याची जबाबदारी मंडळ घेणार नाही, ती तुमची स्वतःची राहील)**

## देणगी

✻ अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे नवनिर्वाचित कार्यकारणी श्री रमेश रामराव पाटील यांनी रुपये ५००१/- देणगी मध्यवर्ती मंडळाच्या सामाजिक कार्यास दिली आह. मध्यवर्ती मंडळातर्फे श्री रमेश पाटील यांचे आभार.

✻ श्री श्रीराम चिंतामणी वाघोलीकर, मध्यवर्ती मंडळाच्या सामाजिक कार्यास रुपये ७५००/- श्री वाघोलीकर यांचे मध्यवर्ती मंडळातर्फे आभार.

## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ सन २०२४ मध्ये विद्यार्थी-विद्यार्थीनींना देण्यात आलेली शैक्षणिक मदत

| संस्थेचे नाव | एकूण मंजूर अर्ज | रक्कम |
|---|---|---|
| अकोला | ३९ | ₹ ९७५००/- |
| नाशिक | २८ | ₹ ८१५००/- |
| कल्याण | ०१ | ₹ २५००/- |
| धाराशिव | ०२ | ₹ ५०००/- |
| जालना | ०२ | ₹ ५०००/- |
| पुणे | ०३ | ₹ ७५००/- |
| सोलापूर | ४४ | ₹ १३२०००/- |
| मंगळवेढा | ०९ | ₹ २२५००/- |
| लातूर | २४ | ₹ ६१५००/- |
| संभाजीनगर | ३३ | ₹ ८२५००/- |
| वडोदरा | १५ | ₹ ४४०००/- |
| एकूण अर्ज | २०० | ₹ ५,४१,५००/- |

WITH
BEST
COMPLIMENTS
FROM

**Ravindra Deshpande**

REC

# RASHMI
# ELECTRICAL & CONTRACTOR

Off. No. 2, Shree Siddhivinayak Commercial Complex,
Near Siddhivinayak Temple, Sector 10,
Airoli, Navi Mumbai 400708.
Mob. : +91 98330 71906, +91 98202 68478
Email : recprojects7@gmail.com


IndusInd Bank
THE ULTIMATE SAVINGS ACCOUNT IS HERE
%
Attractive Interest Rates*
on savings account and fixed deposits
My ACCOUNT My NUMBER
Freedom to choose your account number
GET UP TO 20% OFF
on food & groceries from Swiggy & BigBasket
BUY ONE GET ONE FREE
movie ticket on BookMyShow*
Complimentary Airport Lounge Access*
Attractive discount on all locker types
Indus Mobile
All-in-one app for banking, shopping, travel, payments and much more
AutoPay
Manage your payments & SIPs using UPI, cards & mobile
*T&C Apply
To know more, please speak to our Customer Service Manager or visit us at www.indusind.com


स्नेहाचा सुगंध दरवळला
आनंदाचा सण आला
विनंती आमची परमेश्वराला
सौख्य, समृद्धी लाभो तुम्हाला
आमच्या सर्व सभासदांना, ग्राहकांना, ठेवीदारांना व हितचिंतकांना...
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा
SAMARTH
URBAN CO-OP. CR. SOCIETY LTD.
HEAD OFFICE: Samarth Sadan, Gurukrupa Complex, 1st Floor, Maruti Galli, Belgaum. Ph.: 2431357
RC Nagar Branch: Bhagirathi, C Scheme, Channama Nagar Main Road, Belgaum. Ph.: 2443161
Tilakwadi Branch: Samarth Landmark, Opp. Indian Bank, Mangalwar Peth, Tilakwadi, Belgaum. Ph.: 2430357
Shahapur Branch: 1103, Ground Floor, Bichu Galli, Shahapur, Ph.: 2431257
Khanapur Branch: 1524/A6, Manerikar Bldg., Belgaum-Goa Road, Ph.: 6363090655
चेअरमन
व्हा. चेअरमन
संचालक मंडळ
ॲड. अजय ए. सुनाळकर
अभय व्ही. जोशी
गणपत ए. कुलकर्णी
विनायक जी. जोशी
प्रदीपकुमार जी. कुलकर्णी
अरविंद एस. कुलकर्णी
मालतेश जी. पाटील
सुनंदा सी. आळतेकर
छाया एन. जोशी
अनिल व्ही. भंडारी
उमेश सुणगार
परशुराम एम. कांबळे
अशोक एच. पुजेरी
राघवेंद्र एस. केसनूर
सेक्रेटरी
गौरी एस. बिडी
जन. मॅनेजर
सहकार क्षेत्रात बेळगाव जिल्ह्यात अग्रेसर असलेली पतसंस्था

**Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.


# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

**अद्यावत नूतनीकरण केलेली सर्व सोयींनी उपलब्ध अशी दादर - माहीम विभागातील तळमजल्यावरील वातानुकूलीत सर्व अद्यावत सोयीयुक्त सभागृह. दुसऱ्या मजल्यावरील अद्यावत सोयीयुक्त सभागृह. वधू-वरांसाठी प्रशस्त खोल्या, स्वयंपाकासाठी प्रशस्त किचन मंगलकार्य ठरताच प्रथम खालील ठिकाणी चौकशी करून कार्यालय राखून ठेवा. सोसायटीच्या सभा, संगीताचे कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, नाट्य-तालीम, संमेलन ह्यासाठी पण उपलब्ध**

**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ**

**लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई - ४०० ०१६.**

**दूरध्वनी : २४३०२२७३/२४३०७५७६ Email : aadrbm@gmail.com**


Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH